देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

देशदूत शब्दगंध
रविवार विशेष पुरवणी
राजकारण, विशेष लेख, शब्दकोडे आणि बरंच काही
वाचा दर रविवारी

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५७ । अंक ८ । शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ । पाने - १२ | किंमत ₹ ५

**आतील पानात**

संपादकीय
आकडेवारी अन् जबाबदारी

आंतरराष्ट्रीय
नेपाळमधील हिंसाचाराचे परिणाम

आजकाल
कुंद कुंद ही हवा..

# आरक्षणावरून वाक्‌युद्ध तीव्र

## भुजबळ, जरांगे यांचे एकमेकांवर शब्दबाण





**मुंबई, नाशिक । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात राजकीय वातावरण तापले असून, मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यातील वाक्‌युद्ध अधिकच तीव्र झाले आहे. एकमेकांवर थेट आरोप-प्रत्यारोप करत दोन्ही नेत्यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून शब्दबाण सोडले असून, एकमेकांच्या आरक्षणाविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.प्रवीण गायकवाड यांनी मराठा आरक्षणाच्या नव्या जीआरवर शंका व्यक्त केली आहे. याचदरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठा समाजाच्या 'सारथी' आणि 'अण्णासाहेब पाटील महामंडळा'च्या योजनांचा आढावा घेतला आहे.

### 'जीआरमुळे राज्यात अराजक माजेल'

मराठा आरक्षणासंदर्भात राज्य शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयावर (जीआर) राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र आक्षेप घेत न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाच्या दबावामुळे मंत्रिमंडळासमोर विषय न ठेवता, हरकती न मागवता आणि ओबीसींच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून हा संदिग्ध निर्णय घेण्यात आल्याचा आरोप भुजबळ यांनी केला. या जीआरमुळे राज्यात अराजक माजेल, असा गर्भित इशारा त्यांनी सरकारला दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना भुजबळ म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाज हा मागास नसून पुढारलेला समाज असल्याचे स्पष्ट केले आहे. मराठा किंवा कुणबी-मराठा म्हणूनही त्यांना ओबीसी आरक्षणात समाविष्ट करता येणार नाही. तीन आयोगांनी हे फेटाळले आहे. १९५५ पान ८ वर

### जरांगेशाही नाही, लोकशाही

जरांगे यांच्यावर निशाणा साधताना भुजबळ म्हणाले, कोणी रस्त्यावर उतरण्याची भाषा करत असेल, तर ओबीसी समाजही गावागावांत मोर्चे काढत आहे. हा देश लोकशाहीचा आहे, जरांगेशाहीचा नाही. जीआर मागे न घेतल्यास न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### सरसकट आरक्षण नाही : फडणवीस

मराठा आंदोलनानंतर राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयानुसार सरसकट आरक्षण दिले जाणार नसून, पुरावे तपासूनच आरक्षण मिळणार असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे केला. या निर्णयाला ओबीसी समाजाच्या नेत्यांचा आक्षेप आहे. याशिवाय, त्यांनी न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस म्हणाले, याचिका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. आम्ही विचार करूनच शासन निर्णय काढला आहे.

### 'ओबीसी आरक्षणाला आव्हान देऊ'

मराठा आरक्षणाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्याच्या भूमिकेवरून मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. तुम्ही मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान दिले, तर आम्हीही ओबीसी आरक्षणाला कोर्टात आव्हान देऊ. आमचा जीआर खूप रक्त जाळून मिळवला आहे, त्यात फेरफार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मराठे कोट्यवधींच्या संख्येने रस्त्यावर दिसू, असा इशारा देत दुष्ट विचाराचा नेता ओबीसीला लाभला आहे. वेगळे चॉकलेट देऊन नेते कामाला लावतो, अशा शब्दात जरांगे-पाटील यांनी टीकास्त्र सोडले.

अंबड तालुक्यातील अंकुश नगर येथील निवासस्थानी माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे-पाटील म्हणाले,त्यांना वाटते त्याच्यासारखे सगळे चालावे.आम्ही सर्व लोकशाही मार्गाने करतो. लोकशाही मार्गाने आम्ही सर्व मिळवणार आहेत तुला काय करायचे ते कर.आम्ही पहिलेच कुणबी ओबीसीच्या यादीत आहोत ओबीसीच्या आरक्षणात आहोत.१६ टक्के आरक्षण ओबीसीचे ते पण मागे घ्या.त्यामुळे सुद्धा तणाव होऊ शकतो.

१८० जातीच्या साडेचारशे जाती कशा झाला? हे सुद्धा सरकारने सांगावे असे म्हणत जरांगे म्हणाले, मराठा समाज पुढारलेला आहे, तो मागस नाही असे पान ८ वर



◉ नेपाळची राजधानी काठमांडू येथे सरकारविरोधी निदर्शनांमुळे बंद केलेले विमानतळ, बुधवारी रात्री पुन्हा सुरू झाल्यानंतर, प्रवासी आपापले सामान घेऊन विमानतळावर दाखल झाले.

# अंतरिम पंतप्रधानांवरून आंदोलकांमध्ये मतभेद

**धगधगते नेपाळ**

**काठमांडू । वृत्तसंस्था**

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीविरोधात पेटून उठलेल्या जेनझेड आंदोलकांनी तीव्र आंदोलन करत देशाच्या पंतप्रधानांना राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मात्र, त्यानंतरही नेपाळमधील तणावपूर्ण परिस्थिती अद्याप निवळलेली नाही. सध्या नेपाळमध्ये काळजीवाहू सरकार स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच, त्यासाठी काही नावांवर चर्चा सुरू आहे. मात्र, याचदरम्यान जेन झेडमधील दोन गट आमने सामने येऊन भिडल्याची घटना घडली आहे.

दरम्यान, जेन झेड आंदोलकांनी भारतीय प्रसारमाध्यमांना या भागातून जाण्याची सूचना दिली आहे.

जेनझेडच्या एका गटाने पंतप्रधानपदासाठी सुशील कार्की यांना पाठिंबा दिला आहे. तर दुसऱ्या गटाने कुलमन घिसिंग यांना हंगामी सरकारचे प्रमुख करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्या नावाचा प्रस्तावरही एका गटाने दिला आहे. दरम्यान जेनझेडकडून झालेल्या मारहाणीचा व्हिडिओ समोर आला असून, त्यात एक गट दुसऱ्याला मारहाण करताना दिसत पान ८ वर

# छत्तीसगडमध्ये १० नक्षलींचा खात्मा

## एक कोटीचे बक्षीस असलेला मोडेमचा समावेश

**रायपूर । वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधील गारियाबंद जिल्ह्यातील जंगलात गुरूवारी सुरक्षा दल व माओवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. आठ तासांच्या या धुमश्चक्रीत सुरक्षा दलाने १० नक्षलवाद्यांना ठार केले आहे. यामध्ये एक कोटीचे बक्षीस असलेला जहाल नक्षलवादी व केंद्रीय समिती सदस्य मोडेम बाल कृष्णा उर्फ बालन्ना मनोज याचा समावेश आहे.

पोलीस सूत्रांनुसार, आंध्रप्रदेश व ओडिशा राज्याच्या सीमेलगत छत्तीसगडमधील गारियाबंद जिल्ह्याच्या जंगलात नक्षलवादविरोधी मोहीम सुरु होती. ११ सप्टेंबरला पहाटे दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलाने तडाखेबंद प्रत्युत्तर दिले. तब्बल आठ तास चाललेल्या या चकमकीत १० नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा यंत्रणेला यश आले. अद्याप काही नक्षलवादी जंगलात दडून बसले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून अधूनमधून गोळीबार सुरू आहे. रायपूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक अमरेश मिश्रा यांनी या कारवाईला दुजोरा दिला. घटनास्थळावरून शस्त्रसाठा, साहित्य आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.



◉ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्यात वाराणसी येथे द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशांमध्ये विविध सामंजस्य करार करण्यात आले.

# मित्रपक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम

## सहपालक मंत्र्यांची जबाबदारी निश्चित

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तीन जिल्ह्यांसाठी नेमलेल्या सहपालक मंत्र्यांवरील जबाबदारी निश्चित केली आहे. संबंधित जिल्ह्यातील जनतेच्या तक्रारींचा निपटारा करण्याची कामगिरी सहपालक मंत्र्यांवर सोपवून फडणवीस यांनी मित्र पक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम घातल्याची चर्चा आहे. या निर्णयाने मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांचे पंख कापण्यात आल्याचे बोलले जात आहे.

फडणवीस यांनी मुंबई उपनगर, कोल्हापूर आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांसाठी सहपालक मंत्री नेमले आहेत. राज्यात सहपालक मंत्री नेमण्याची प्रथा २०१४ पासून सुरु झाली. जानेवारी महिन्यात मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मंगल प्रभात लोढा आणि कोल्हापूर जिल्ह्यासाठी माधुरी मिसाळ यांना सहपालक मंत्री नेमण्यात आले होते. अलीकडच्या काळात वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांना बुलढाणा जिल्ह्याचे सह पालकमंत्री करण्यात आहे.


मात्र, या सहपालक मंत्र्यांची विवक्षित जबाबदारी निश्चित झाली नव्हती. त्यामुळे सरकार दरबारी सहपालक मंत्र्यांच्या कामाबाबत पान ८ वर

**थोडक्यात**

### देवव्रतांकडे महाराष्ट्राचा अतिरिक्त कारभार

**मुंबई ।** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्याने महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. राष्ट्रपती भवनातून गुरुवारी याबाबतची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे आचार्य देवव्रत गुजरातसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळणार आहेत. दरम्यान, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या उद्या होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला जाणार आहेत.

**कांदा भाव**



| | | |
|---|---|---|
| किमान | : | ५०० |
| कमाल | : | १६७० |
| सरासरी | : | १२५१ |

**शेअर बाजार**

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | : ८१५४९ (+१२४) |
| निफ्टी | : २५००६ (+३२) |

**सोने-चांदी**

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,०९,४०० |
| २२ कॅरेट | १,००,६५० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,२६,००० |

**तापमान**

| | | |
|---|---|---|
| किमान | : | १९.६° |
| कमाल | : | २९.१° |

**मिश्किली** धनंजय एकबोटे




काळजी करण्यासारखे काही नाही! साहेबांनी घोटाळे केले असावेत. त्यामुळे आंदोलनाची स्वप्ने पडून रात्री दचकून उठून बसतात!

# जिल्ह्यात पावसाचा तीन दिवस 'येलो अलर्ट'

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यात शनिवार दि.१३ ते १५ सप्टेंबर दरम्यान हवामान खात्याने 'येलो अलर्ट' जारी केला आहे. कृषी क्षेत्रावरील प्रभाव आधारित अंदाज आणि इशाऱ्यानुसार, या कालावधीत जिल्ह्यात तसेच घाट क्षेत्रात काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, पाऊस आणि सोसाट्याचा वारा (३०-४० कि.मी./तास) वाहण्याची शक्यता आहे.

दि.१४ रोजी जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज महात्मा फुले कृषी विद्यापीठ, इगतपुरी येथील विभागीय कृषी संशोधन केंद्राने वर्तविला आहे.

# इस्त्रायलचा ७२ तासांत सहा देशांवर हल्ला

**जेरूसलेम । वृत्तसंस्था**

गेल्या ७२ तासांत इस्त्रायलने ६ देशांवर हल्ला केला आहे. यामध्ये गाझा (पॅलेस्टाईन), सीरिया, लेबनॉन, कतार, येमेन आणि ट्युनिशिया यांचा समावेश आहे. या हल्ल्यांमध्ये २०० हून अधिक लोक मारले गेले आणि १००० हून अधिक जखमी झाले.

सोमवार ते बुधवार दरम्यान हे हल्ले करण्यात आले. इस्त्रायलचे म्हणणे आहे की ते या देशांमध्ये दहशतवादी अड्ड्यांवर लक्ष केंद्रित करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी यावर इस्त्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे. तथापि, इस्त्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांनी कतारची राजधानी दोहा येथे हमासच्या अधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याचे समर्थन केले. त्यांनी या हल्ल्याची तुलना ९/११ च्या हल्ल्यानंतर अमेरिकेच्या कारवाईशी केली.

इस्त्रायली सैन्याने मंगळवारी कतारची राजधानी दोहावर हवाई हल्ला केला. हा हल्ला हमास प्रमुख खलील अल-हय्या यांना लक्ष्य करून करण्यात आला. यामध्ये अल-हय्याचा मुलगा, ऑफिस डायरेक्टर, तीन गार्ड आणि एका कतारी सुरक्षा अधिकाऱ्यासह सहा जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्याच्या वेळी हमासचे नेते अमेरिकेच्या युद्धबंदी प्रस्तावावर चर्चा करत होते. या हल्ल्यानंतर हमासने युद्धबंदी करण्यास नकार दिला.

# अमेरिकन मंत्र्याचा भारताला पुन्हा इशारा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारत आणि अमेरिकेतील ताणलेले संबंध पूर्ववत होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, आता अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवावी, असा इशारा दिला. त्यामुळे आता हे संबंध आणखी ताणले जाण्याची शक्यता आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५+२५, असा एकूण ५० टक्के कर लादला आहे. तसेच, त्यांनी भारतावर अनेकदा टोकाची टीकाही केली आहे. मात्र, अलिकडेच त्यांनी पंतप्रधान मोदींना आपला खास मित्र म्हणत, ताणलेले संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. मात्र, आता ट्रम्प यांचेच मंत्री भारताला धमकावत आहेत.

# जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर?

**वेध निवडणुकीचे**

## चक्राकार आरक्षण अध्यादेश वादाच्या भोवऱ्यात

**नाशिक । विजय गिते**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमधील चक्राकार आरक्षण पद्धतीला राज्य सरकारने २० ऑगस्ट २०२५ रोजी जारी केलेल्या अध्यादेशामुळे खो बसला आहे. आधीच्या कायद्यात कोणताही बदल न करता हा अध्यादेश काढण्यामागील सरकारचा हेतू स्पष्ट नाही. त्यामुळे यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी हाच मुद्दा उपस्थित करत अध्यादेश न्यायालयात टिकेल का?, असा प्रश्न निर्माण केला आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट असल्याचे चित्र आहे. पान ८ वर

### अध्यादेशाला विरोध का?

आतापर्यंत चार निवडणुकांमध्ये चक्राकार आरक्षण पद्धतीने विविध प्रवर्गांना संधी मिळाली होती. मात्र, नव्या अध्यादेशामुळे अधिक लोकसंख्या असलेले गट पुन्हा त्या प्रवर्गासाठी आरक्षित होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कमी लोकसंख्या असलेल्या गटांना आरक्षण मिळण्यास अनेक वर्षे वाट पाहावी लागेल. यामुळे सरकारच्या अध्यादेशाला तीव्र विरोध झाला आहे. याचिकाकर्त्यांनी अध्यादेशाचा हेतू स्पष्ट नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. मागील कायद्यात कोणताही बदल न करता हा अध्यादेश काढण्यामागील उद्देश संशयास्पद असल्याचे याचिकेत नमूद आहे.

### न्यायालयाचा निकाल प्रलंबित

नागपूर खंडपीठाने सरकारला ११ सप्टेंबरपर्यंत म्हणणे मांडण्यास सांगितले आहे. सरकारने म्हणणे मांडल्यानंतर न्यायालय निकालासाठी आणखी वेळ घेऊ शकते, त्यामुळे आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर होण्यास किमान एक ते दोन महिन्यांचा विलंब होऊ शकतो. यामुळे आधीच साडेतीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

# मनसे-ठाकरे गटाचा आज जनआक्रोश मोर्चा

**नाशिक । प्रतिनिधी**

हनी ट्रॅपच्या चौकशीसह विविध मागण्यांसाठी मनसे व उद्धव सेनेच्यावतीने शुक्रवारी (दि.१२) बी. डी. भालेकर मैदान येथून सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर संयुक्तपणे जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

शहरात व जिल्ह्यात अनेक दिवसांपासून एमडी ड्रग्ज, अमली पदार्थ, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत व कोयता गँग यांची दहशत यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, कर्जमाफी, हमीभाव, वीजपुरवठा या आश्वासनांची फसवणूक, स्मार्ट सिटी, पाणीपुरवठा, रस्ते कामांत कोट्यवधींचे घोटाळे, शहराच्या रस्त्यातील खड्ड्यांकडे दुर्लक्ष, स्मार्ट मीटर आणि खासगीकरणाच्या नावाखाली घराघरात लूट, नागरिकांवर अधिक बिलांचा भार, कुंभमेळ्यासाठी तयारी शून्य, बाहेरच्या कंत्राटदारांना प्राधान्य देत स्थानिकांना वंचित ठेवण्यात आले आहे. कोट्यवधी रूपये खर्चूनही प्रकल्प बंद असून गोदावरीसह नद्यांचे प्रदूषण वाढले, आयटी पार्क व मोठे प्रकल्प शहरात येत नसल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात येणार आहे.

या जनआक्रोश मोर्चासाठी संपूर्ण जिल्ह्यात ठिकठिकाणी मेळावे, बैठका घेण्यात आल्या असून, मोर्चाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून हजारो मोर्चेकरी सहभागी होतील असे दोन्ही पक्षांच्यावतीने सांगण्यात आले.

या मोर्चाचे नेतृत्व मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, उद्धवसेनेचे उपनेते दत्ता गायकवाड, माजी आमदार वसंत गिते यांच्यासह रतनकुमार इचम, जयंत दिंडे, डी. जी. सूर्यवंशी, अंकुश पवार, सुदाम कोंबडे, प्रथमेश गिते, सुजाता डेरे, नामदेव पाटील, संदीप किरवे, अस्लम मणियार, बंटी कोरडे यांच्याकडे राहणार आहे.